प्रेसनोट दि. १६.०६.२०२६

आरोपी लोकसेवक १) श्री. राजशेखर रामचंद्र कोळी, पोह/५६७ नेमणुक- अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण रा. अशोक चौक, सोलापूर २) श्री. लक्ष्मीकांत दत्तात्रय देडे, पोकॉ ६१९ नेमणुक- अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण रा. अशोक चौक, सोलापूर, ३) श्री. आकाश शरण्णाप्पा काडरामे, वय ३३ वर्षे, खाजगी इसम, रा. अझाद गल्ली अक्कलकोट यांनी तक्रारदार यांची स्कॉर्पिओ गाडी तक्रारदार यांचे मित्राने फिरण्यासाठी मागुन घेतली होती. सदर गाडी अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे येथे गुरनं. ३६६/२०२६ या गुन्हयात वापरली असल्याचा संशय असल्याने आलोसे पोह/ कोळी व पोकॉ/ देडे यांनी तक्रारदार यांचे लहान भावाचा मोबाईल व सदर स्कॉर्पिओ गाडी चार दिवसापूर्वी ताब्यात घेतली. तसेच आलोसे यांनी तक्रारदार यांचे वडील व काका यांना सदर गुन्हयात नाव टाकुन अटक करतो अशी धमकी देवुन गाडी, मोबाईल परत देण्यासाठी व तक्रारदार यांचे वडील व काका यांना जामीन करुन देण्यासाठी वर नमुद आरोपी १ ते ३ यांनी सुरुवातील १,४०,०००/- रुपये मागणी करुन तडजोडी अंती १,२०,०००/- रुपये आरोपी क्र ३ आकाश काडरामे यांनी आरोपी क्र. १ व २ यांचेकरीता स्वीकारले म्हणून गुन्हा नोंद.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग	सोलापूर युनिट, पुणे परिक्षेत्र.
पोलीस ठाणे/गुन्हा नोंदक्रमांक	अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
कलम	भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा कलम ७, ७ अ व १२ प्रमाणे.
आरोपीचे नाव व कार्यालय	१) श्री. राजशेखर रामचंद्र कोळी, पोह/ ५६७ नेमणुक- अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण रा. अशोक चौक, सोलापूर २) श्री. लक्ष्मीकांत दत्तात्रय देडे, पोकॉ/ ६१९, नेमणुक- अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण रा. अशोक चौक, सोलापूर, ३) श्री. आकाश शरण्णाप्पा काडरामे, वय ३३ वर्षे, खाजगी इसम, रा. अझाद गल्ली अक्कलकोट ता. अक्कलकोट जि. सोलापूर
मागणी केलेली लाचेची रक्कम	१,४०,०००/- रुपये तडजोडी अंती १,२०,०००/- रुपये
स्विकारलेली लाचेची रक्कम	१,२०,०००/- रुपये.
पडताळणी दिनांक	पडताळणी कारवाई- १५/०६/२०२६ रोजी,
सापळा दिनांक	यशस्वी सापळा कारवाई दि. १५/०६/२०२६ रोजी
सापळा अधिकारी	श्री. रविंद्र लांभाते, पोलीस निरीक्षक, एसीबी, सोलापूर
तपास अधिकारी	श्री. शैलेश पवार, पोलीस निरीक्षक, एसीबी, सोलापूर.
थोडक्यात माहिती	यातील तक्रारदार यांची स्कॉर्पिओ गाडी तक्रारदार यांचे मित्राने फिरण्यासाठी मागुन घेतली होती. सदर गाडी अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे येथे गरनं. ३६६/२०२६ या गुन्हयात वापरली असल्याचा संशय असल्याने आलोसे पोह/ कोळी व पोकॉ/ देडे यांनी तक्रारदार यांचे लहान भावाचा मोबाईल व सदर स्कॉर्पिओ गाडी चार दिवसापूर्वी ताब्यात घेतली. तसेच आलोसे यांनी तक्रारदार यांचे वडील व काका यांना सदर गुन्हयात नाव टाकुन अटक करतो म्हणुन गाडी, मोबाईल परत देण्यासाठी व तक्रारदार यांचे वडील व काका यांना जामीन करुन देण्यासाठी आलोसे पोह/ राजशेखर रामचंद्र कोळी व पोकॉ/ लक्ष्मीकांत दत्तात्रय देडे यांचे वतीने आरोपी क्र ३ आकाश काडरामे यांनी केलेल्या लाच मागणीबाबत पोह/ राजशेखर कोळी व पोह/ लक्ष्मीकांत देडे यांची पंचासमक्ष पडताळणी केली असता त्यांनी सुरुवातील १,४०,०००/- रुपये मागणी करुन तडजोडी अंती १,२०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम आरोपी क्र ०३ यांचेकडे देण्यास सांगीतले. आलोसे पोह/ कोळी व पोकॉ/ देडे यांचे वतीने आरोपी क्र ०३ आकाश काडरामे यांनी १,२०,०००/- रुपये अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे समोर पंचासमक्ष स्विकारली असल्याने त्यांना ताब्यात घेतले आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपायुक्त/ पोलीस अधिक्षक, एसीबी पुणे मो.क्र ९८२३१६७१५४, श्री. अजित पाटील, अपर पोलीस अधीक्षक, एसीबी पुणे. मो.क्र ९०२९०३०५३०, श्री.अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, एसीबी पुणे. मो.क्र ८३९००२६५४९, श्री. प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, एसीबी सोलापूर. मो.क्र. ९८२३२२५४६५ यांचे मार्गदर्शनाखाली श्री.रविंद्र लांभाते, पोलीस निरीक्षक, एसीबी, सोलापूर, पोलीस अंमलदार पोह/ संतोष नरोटे, पोकॉ/ गजानन किणगी, चापोकॉ/ अक्षय श्रीराम सर्व नेमणुक एसीबी सोलापूर यांनी केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देणेसाठी कायदेशीर फी व्यतरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर कार्यालयास संपर्क साधण्याचे आवाहन श्री. प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, एसीबी सोलापूर. मो.क्र. ९८२३२२५४६५ यांनी केले आहे.

संपर्क पत्ता- पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, श्री छत्रपती शिवाजी महाराज रंगभवन चौक, सोलापूर.
संकेतस्थळ- www.acbmaharashtra.gov.in
ई मेल-www.acbwebmail@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप-acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक- १०६४
दुरध्वनी क्रमांक- ०२१७-२३१२६६८
व्हॉटसॲप क्रमांक – ९४०४० ०१०६४

सहा.पो.आयुक्त/पोलीस उप अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर. सत्यमेव जयते

16/6/26
(प्रशांत चौगुले)
सहा. पोलीस आयुक्त / पोलीसउप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर.